# ई - पोलीस पत्रिका

दि०३/०६/२०२४ अनु.क्र.९८

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**०१.पोआअ/आस्था-१/लालुप्रवि सिंचन-मेटकर/५०१९/२०२४अमरावती शहर दिनांक२४/०५/२०२४**

**संदर्भ :-** पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.पोअ/प्रलि /आस्था/सिंचन प्रकल्प चौकशी/२९८/२०२४, दिनांक ०४.०५.२०२४

### आदेश

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये, पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस नाईक/१३५, राजेश मनोहर मेटकर, नेमणूक पो.स्टे. खोलापुरीगेट, अमरावती शहर, यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती येथे सिंचन प्रकल्पातीलसुरू असलेल्या गुन्हे तपास व उघड चौकशी संबधाने स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकातील अधिकाऱ्यांना मदतनीस म्हणून पुढील आदेशापर्यंत संलग्न करण्यात येत आहे.

**०२.पोआअ/पशा-१/अधि.अति.कार्यभार/५१९१/२०२४अमरावती शहर दिनांक ३०/०५/२०२४**

### आदेश

श्री.हनमंत डोपेवाड, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. नांदगांव पेठ, अमरावती शहर यांना दि. २७.०५.२०२४ तेदि. ३१.०५.२०२४ पर्यंत ५ दिवस अर्जित रजा मंजुरकरण्यात आली आहे. रजेच्या कालावधी मध्ये त्यांचे कडील पदाचा अतिरीक्त कार्यभार श्रीमती कल्याणी हुमणे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे.सायबर, अमरावती शहर यांचे कडे सोपविण्यात आला आहे.

दि. ३१.०५.२०२४ रोजीश्रीमतीकल्याणीहुमणे, पोलीस निरीक्षक, पो. स्टे. सायबर, यांची मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, खंडपीठ नागपूर येथे सुनावणीकरीतासाक्ष असल्यानेसदर कालावधी मध्ये त्यांचे कडील पदाचा पोलीस निरीक्षक पो.स्टे.सायबर व पो.स्टे.नांदगांव पेठ, अमरावती शहर या पदाचा अतिरीक्त कार्यभार श्रीमती रेखा लोंढे, पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, अमरावती शहर यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

## प्रशिक्षण

**०१.पोआअ/पशा-१/BDDS/जोखीम भत्ता/४९९३/२०२४अमरावती शहर दिनांक २४/०५/२०२४**

### आदेश

खालील नमुद पोलीस अधिकारी यांची त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दिनांकास बॉम्ब शोधक व नाशक पथकात नेमणुक करण्यात आलेली असुन त्यांनी महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे घातपात विरोधी तपासणी मुलभुत प्रशिक्षण (सत्र क्र. ०३/२०२४) यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे.

| अ. क्र. | नांव पदनाम | नेमणुक | बीडीडीएस पथकातील नेमणुकीचा दिनांक | बीडीडीएस बेसीक प्रशिक्षक पुर्णकेल्याचा दिनांक | प्रोत्साहन (जोखीम) भत्ता अनुज्ञेयतेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानेश्वर नरवणे, पोलीस उपनिरीक्षक | बॉम्ब शोधक व नाशक पथक, अमरावती शहर | दि.२९.०२.२०२४ | दि. २६.०३.२०२४ ते दि.०६.०४.२०२४ | दि. २९.०२.२०२४ |

शासन निर्णय गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसएसए-०११९/प्र.क्र. २१/ विशा-४ दिनांक ०५ सप्टेंबर, २०२२ मधील तरतुदी नुसार बॉम्ब शोधक व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगा नुसार (घरभाडे व पुरक भत्ते वगळून) त्यांच्या मुळ वेतनाच्या २५% व सशस्त्र पोलीस शिपाई (मोटार वाहन चालक) यांना सातव्या वेतन आयोगानुसार त्यांच्या मुळ वेतनाच्या १५% प्रोत्साहन (जोखीम) भत्ता दि. ०१.०१.२०१६ पासुन मंजूरकरण्यात आला आहे.

बॉम्ब शोधक व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रोत्साहन भत्या बाबत खालिल सुत्र देण्यात आले आहे.

**सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे मुळ वेतन X ०.२५ = सातव्या वेतन आयोगामधील प्रोत्साहन भत्ता**

त्यानुषंगानेश्री. ज्ञानेश्वर नरवणे, पोलीस उपनिरीक्षक यांना बॉम्ब शोधक व नाशक पथक, अमरावती शहर येथे नेमणुकीचे दिनांकापासुन (२९.०२.२०२४) सातव्या वेतन आयोगा नुसार त्यांच्या (घरभाडे व पुरक भत्ते वगळून) मुळ वेतनाच्या २५% प्रोत्साहन (जोखीम) भत्ता मंजूर करण्यात येत असुन या रकमे वर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

सदरचा खर्च २०५५- पोलीस -१०९ जिल्हा पोलीस (००) (जिल्हा पोलीस दल (२०५५०१६८) ०१ वेतन या लेखा शिर्षाखाली मंजूर व उपलब्ध अनुदानातुन भागविण्यात यावाव थकबाकी रोख स्वरुपात अदाकरण्यात यावी.

**०२.पोआअ/पशा-१/प्रशि./MDDC/५२४९/२०२४अमरावती शहर दिनांक ३१/०५/२०२४**

## आदेश

**संदर्भ :-** समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट-१, पुणे यांचे वायरलेस संदेशक्र. CB-III/MDDC-४७६/४०२५/२०२४, दिनांक २२.०५.२०२४

**विषय :-** MDDC COURSE प्रशिक्षण बाबत.

# आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येतेकी, राज्य राखीव बल गट क्र. १, पुणे येथे MDDC COURSE या विषयावर खालिल नमुदसत्राकरीतात प्रशिक्षणाचे आयोजनकेलेले आहे. अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद अधिकारी यांचीत्यांचे नावापुढील सत्राचे प्रशिक्षणा करीता निवड करण्यात येत आहे.

| प्रशिक्षणकेंद्राचे नाव | बॅच क्रमांक | कालावधी | नेमणुक झालेल्या अधिका-याचे नांवे |
|---|---|---|---|
| राज्य राखीव बल गटक्र १, पुणे | ४७६ | ०३.०६.२०२४ to १५.०६.२०२४ | **श्री. राहुल महाजन, पोलीस उपनिरीक्षक, पो. स्टे. वलगाव मो. क्र. ७०५७३१७०१५** |

उपरोक्त पोलीस अधिकारी यांना त्यांचे सोबत प्रत्येकी रु. ४०००/- (अक्षरी- रुपये चारहजार फक्त) प्रशिक्षण शुल्क**पोलीस प्रशिक्षण निधी मधुन** मंजूरकरण्यात येत आहे.

**प्रशिक्षणकेंद्रात जाण्यापुर्वी त्याबाबतचे नियम व अटीखालील प्रमाणे :-**

१. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी प्रशिक्षणाचे अगोदरचे दिवशी **दि. ०२.०६.२०२४ रोजी १८.०० वाजता चे आत** प्रशिक्षणस्थळी पोहचावे.

२. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी PHYSICAL FITNESS CERTIFICATE, ID CARD, 2 NO. OF WHITE FULL PANTS &2 NOS. OF WHITE T-SHIRTS, 2 NOS, OF UNIFORMS, ONE PIECE BARRET CAP & P. CAP, BROWN OR BLACK SHOES, 2 NOS OF WHITE SHOES,, RELIEVING MEMO इत्यादीसाहित्य सोबत नेणे आवश्यक आहे.

३. उशिरा पोहचणा-या अधिका-यांना प्रशिक्षणास ॲडमिशन मिळणार नाही. व त्यांना परतकरण्यात येईल. तसेच प्रशिक्षणा दरम्यान कोणतेही रजा किंवा परवानगी मिळणार नाही.

## रजा

**०१.पोआअ/पशा-१/प्रसुती रजा-पोउपनि-मामनकर/५१५९/२०२४अमरावती शहर दिनांक २९/०५/२०२४**

# आदेश

महाराष्ट्र शास□वित्त विभाग, शास□निर्णय अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-६, दिनांक २४/०८/२००९ अ□ये तसेच शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक प्ररजा - २०१५/प्र.क्र. २५ सेवा ६ दिनांक १५.०१.२०१६ मधीलतरतुदीनुसारखालील नमुद महिला अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे १८० दिवस प्रसुती रजा, (विशेष रजा), रजा वेतनासह **दिनांक ०९.०६.२०२४ पासुन मंजुरकरण्यांत येत आहे**.

| अ.क्र. | पदनाम व हुद्या | नेमणुक | संभाव्य प्रसुतीचीतारीख | प्रसुतीचा रजा मंजुरीचा कालावधी | प्रसुतीची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती भारती मामनकर, म.पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. वलगांव | १९.०६.२०२४ | **दिनांक- ०९.०६.२०२४ पासुन अथवा प्रसुतीच्या दिनांकापासुन**- १८० दिवस | प्रथम |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## सेवानिवृत्त

**०१.पोआअ/पशा-१/निवयो-सेनि/पो.नि./मेश्राम/४८०१/२०२४ अमरावती शहर दि.१७/०५/२०२४**

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक यांचे आदेशक्र. पोमसं/३/१०/५२८८/से.नि. (अधिसुचना)/२७७/ २०२३ दिनांक १६/०४/२०२४

## आदेश

श्री पुंडलिक यादवराव मेश्राम, पोलीस निरीक्षक, पोलीसकल्याण कक्ष, अमरावती शहर यांची जन्म दिनांक १२/०५/१९६६ आहे.श्रीपुंडलिकमेश्राम, पोलीस निरीक्षकहे दिनांक १२/०५/२०२४ रोजी वयाची ५८ वर्षे पुर्णकरीत असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२, मधील नियम १० (१) अन्वये दिनांक ३१/०५/२०२४ ला मा.नं.पासुन नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/आस्था-१/विदेश दौरा/पोहवा-सादीक-५९३/४९४७/२०२४अमरावती शहर दिनांक २२/०५/२०२४**

## आदेश

**संदर्भ :-** पोहवा/५९३,मोहम्मद सादीक मो.हसन,नेमणूक पो.स्टे.कोतवाली यांचा दि.१३.०५.२०२४चाअर्ज.

**विषय :-** मक्का, मदीना (सौदी अरबीया) येथेहज यात्रे करीता जाणेची परवानगी देणे बाबत. पोहवा/५९३,मोहम्मद सादीक मो.हसन, नेमणूक पो.स्टे.कोतवाली, अमरावती शहर

उपरोक्तसंदर्भवविषयान्वये,पोहवा/५९३,मोहम्मद सादीक मो.हसन,नेमणूक पो.स्टे.कोतवाली,अमरावती शहरयांनी हज यात्रे करीता मक्का मदीना (सौदी अरबीया) येथे जाण्याची पुर्वपरवानगी संदर्भीय अर्जानुसार मागितलेली आहे.

त्यांनाभारतगणराज्यचापासपोर्टक्र.U११३१५१३ प्राप्तझालेलाआहे.मक्का मदीना (सौदी अरेबीया) येथेहज यात्रेला जाणे करिता त्यांना अंदाजे रु ७,००,०००/-प्रवासखर्च अपेक्षित असल्याचे व सदर रकमेची जुळवा जुळव त्यांनी खालील मार्गाने केल्याचे विनंती अर्जाद्वारे कळविले आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **रक्कम** |
|---|---|---|
| १. | भविष्य निर्वाह निधीतुन मिळालेली रक्कम<br>(बँक स्टेटमेंट सोबत जोडले आहे.) | रु.५,००,०००/- |
| २. | एलआयसीकडुन जमा झालेली रक्कम<br>(बँक स्टेटमेंट सोबत जोडले आहे.) | रु.२,३९,१५०/- |
| | **एकुण** | **रु.७,३९,१५०/-** |

पोहवा/५९३,मोहम्मद सादीक मो.हसन,नेमणूक पो.स्टे.कोतवाली,अमरावतीशहर यांचे विरुद्ध विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही, त्यांचे विरुद्ध न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही. तसेच विदेशा मध्ये जाण्यास प्रतिबंद करण्या इतपत कोणत्याही प्रकारच्या प्रतिकुल बाबी नाही.

शासनपरिपत्रक,सामान्यप्रशासनविभाग,क्र.परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११, दि.२९.१२.२०१४ मधील परिच्छेद क्र.१३ व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/६/एनजीओ/खाजगी विदेशदौरा/संकिर्ण/२२२/२०१७,दि.२१.०८.२०१७ तरतुदी नुसार पोहवा/५९३,मोहम्मद सादीक मो.हसन, यांना त्यांच्या विनंती अर्जा नुसार मक्का मदीना (सौदी अरेबीया) येथे हज यात्रे करीता स्वखर्चाने व रजा घेऊन खाजगी विदेश दौरा करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस